मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय (कार्यासन-३३ निवडणूक शाखा) मधील "टंकलेखक (मराठी / इंग्रजी), गट-क" संवर्गातील २ अस्थायी पदे "लिपिक-टंकलेखक, गट-क" या अस्थायी पदात रुपांतरित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-३५१९/प्र.क्र.३७/१९अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख : २२ फेब्रुवारी २०१९

वाचा :

(१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-एसआरव्ही-१०८९/प्र.क्र.२४अ/८९/बारा, दिनांक २६ नोव्हेंबर १९९०
(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दिनांक २ जून २०१५
(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-अपमु-२९१७/प्र.क्र.४४/१९अ, दिनांक ११ सप्टेंबर २०१८
(४) कार्यालयीन आदेश, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-साप्रआ-१२१८/प्र.क्र.९५३/१९, दिनांक २० डिसेंबर २०१८

प्रस्तावना :

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक-३, दिनांक ११ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र-अ मधील तक्ता (ड.) नुसार मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकरिता विविध संवर्गातील २४ अस्थायी पदांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात येत आहेत. त्यात अ.क्र ११.मधील २ टंकलेखक (मराठी / इंग्रजी) पदांवर आस्थापना शाखेच्या संदर्भाधीन क्रमांक-४, दिनांक २० डिसेंबर २०१८ च्या कार्यालयीन आदेशान्वये २ लिपिक-टंकलेखकांची सदर संवर्गाच्या मंजूर पदांवर नियुक्ती करण्यात आल्यामुळे, रोख शाखेस या २ लिपिक-टंकलेखकांचे सेवार्थमधून वेतन काढण्यास अडचणी येत आहे. यामुळे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय (कार्यासन-३३ निवडणूक शाखा) मधील २ अस्थायी "टंकलेखक" हे पद "लिपिक-टंकलेखक" पदांमध्ये रुपांतरित करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सामान्य प्रशासन विभागांतर्गत मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय (कार्यासन-३३ निवडणूक शाखा) मधील टंकलेखक (मराठी / इंग्रजी) आणि लिपिक-टंकलेखक या दोन्ही गट-क संवर्गातील पदांची वेतनश्रेणी पीबी-१, रुपये २०२००-५२०० अधिक ग्रेड वेतन रुपये १९०० तसेच कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्यामुळे शासनावर कोणताही अतिरिक्त खर्च वाढणार नाही. यामुळे वित्त विभागाच्या क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दिनांक २ जून २०१५ तसेच सामान्य प्रशासन

विभागाच्या क्रमांक-एसआरव्ही/१०८९-प्र.क्र२४.अ/८९/बारा, दिनांक २६ नोव्हेंबर १९९० च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातील) कार्यासन ३३-निवडणूक शाखा “टंकलेखक (मराठी / इंग्रजी)” संवर्गातील २ अस्थायी पदे समकक्ष वेतन संरचनेतील “लिपिक-टंकलेखक” या अस्थायी पदात कायमस्वरुपी आदेशाच्या दिनांकापासून रुपांतरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२२१४१३०७२३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Deepak Pandurang Lanjekar

Digitally signed by Deepak Pandurang Lanjekar
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=50aee5be80b8f41754378fd9d8a0a12c0a445a745e540a405b3cdd04cebdde40, serialNumber=bcc288af57c36e3d108e6290737d2413f2fcf284c5ff204a8683a0128208de77, cn=Deepak Pandurang Lanjekar
Date: 2019.02.22 14:55:06 +05'30'

(दी.पां.लांजेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग.
२. प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. अवर सचिव (कार्यासन-३३, २६-रोख शाखा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी (कार्यासन-१९, ३३), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. वैयक्तिक नस्ती / कार्यासन-१९.
१०. निवड नस्ती / कार्यासन-१९अ.